Trust Deed

परिशिष्ट 'ब'

**महाराजा सयाजीराव गायकवाड राष्ट्रीय ज्ञान प्रबोधिनी या संस्थेचे ज्ञापन.**

**मेमोरॅण्डम ऑफ असोसिएशन**

१) संस्थेचे नांव :- महाराजा सयाजीराव गायकवाड राष्ट्रीय ज्ञान प्रबोधिनी,४०१, गगनगिरी कॉम्पलेक्स,एकात्मता चौकाजवळ कॅम्प.रोड, मालेगांव जि.नाशिक

२) संस्थेच्या कार्यालयाचा पत्ता :- महाराजा सयाजीराव गायकवाड राष्ट्रीय ज्ञान प्रबोधिनी,४०१, गगनगिरी कॉम्पलेक्स,एकात्मता चौकाजवळ कॅम्प.रोड, मालेगांव जि.नाशिक

३) संस्थेचे कार्यक्षेत्र :- महाराष्ट्र राज्य

४) संस्थेचे उद्देश व ध्येय खालीलप्रमाणे :-

१) शैक्षणिक संस्था चालविणे , व्यवस्थापन करणे .

२) कला,विज्ञान,व्यवसायीक शिक्षण,उद्योग,वाणिज्य दंत,कृषी,वैद्यकिय,औषधनिर्माणशास्त्र, आयुर्वेद,होमिओपॅथी, युनानी,सार्वजनिक आरोग्य,तंत्रशिक्षण,सामाजिक कार्य, शारिरीक शिक्षण,शिक्षण शास्त्र पदवि, पदविका,व इतर शैक्षणिक अभ्यासक्रम सुरू करणे,चालविणे त्यादृष्टीने निधर्मी शिक्षणास पोत्साहन देणे .

३) किडन गार्डन,पुर्वप्राथमिक , प्राथमिक मॉटेसरी,इंग्रजी माध्यमाच्या शाळा,व निवासी शाळा,माध्यमिक शाळा, कनिष्ठ व वरीष्ठ महाविद्यालय, वाचनालय,प्रयोग शाळा, सुरू करणे व इतर शैक्षणिक संस्थाच्या सहकार्याने विविध शैक्षणिक संस्था स्थापन करणे,त्यांचे व्यवस्थापन करणे, त्या उभारणे इत्यादी.

४) पदव्युत्तर संशोधन कार्य ,विविध अभ्यासक्रम,शैक्षणिक संस्था व इतर शैक्षणिक संस्थाच्या सहकार्याने उभारणे , वाढीस लावणे,त्या स्थापन करणे,त्याचे व्यवस्थापन करणे.

अध्यक्ष  उपा-ध्यक्ष  सरचिटणीस

Adv. Rikhab G. Jain
Notary (Govt. of India)

५) विद्यार्थ्यांसाठी , संकुल,शैक्षणिक सुविधागृहे निर्माण करणे स्थापन करणे उपलब्ध करूण देणे,नोकरी करणाऱ्या महिलासाठी वसतीगृह बांधणे , संचलित करणे.

६) संस्थेने निर्धारित केल्याप्रमाणे विविध अभ्यासक्रम शाळा, महाविद्यालय व इतर शैक्षणिक संस्था अनुदान मंजुर करणे, आर्थिक व इतर साह्य करणे.

७) शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यतुन लोकांचे जिवनमान उंचविणे .

८) जात,पंथ, धर्म व वर्ण याचा विचार न करता सर्व लोकांना वैद्यकिय ,शस्त्रक्रिया यासाठी व संस्थेने वेळोवेळी उद्दिष्टेनुसार योग्य ती मदत करणे, साह्य करणे, सेवा करणे.

९) एक्स-रे केंद्र, प्राथमिक औषधोपचार केंद्र, कारखाने,बाह्य अंतर्गत चिकित्सा सेवा देणारी वैद्यकिय महाविद्यालये, नर्सिंग केंद्रे,रूग्णवाहिका त्याबाबतच्या सेवेच्या अभ्यासक्रम , प्रशिक्षण,संबोधनाला चालना देणे, स्थापना करणे त्यांचे व्यवस्थापन करणे व नियंत्रण करणे.

१०) संस्थेमार्फत रूग्णालय चालविणे,वरीष्ठ उद्दिष्टासाठी पात्रता धारक सर्जन ,डॉक्टर्स,नर्सेस, सहाय्यक,परिचर यांना विविध साह्यभूत सेवा,सेवाभावी तत्वावर,विनावेतन मानवतावादी दृष्टीकोनातून उपलब्ध करून देणे, निर्माण करणे

११) मुलांसाठी व मुलींसाठी संस्थेने ठरविलेल्या ठिकाणी वस्तीगृहाची उभारणी करणे.

१२) निधर्मी शैक्षणिक तत्वासाठी , ज्ञानासाठी ना नफा- ना तोटा या तत्वाखाली पुस्तके, मासिके,इतर साहित्य प्रकाशन करणे.

अध्यक्ष | उपा-ध्यक्ष | सरचिटणीस

RIKHAB G. JAIN ADVOCATE & NOTARY GOVT. OF INDIA Regn. No 2553 Washim Dist. Area MALEGAON (MAHARASHTRA)

Adv. Rikhab G. Jain
Notary (Govt. of India)

१३) संस्थेच्या उद्दीष्टासाठी व तत्वाखाली माहिती पुस्तीका, मासिके, माहितीपत्रके, प्रकाशित करणे, वितरीत करणे.

१४) निधर्मी शिक्षणासाठी व उपयुक्त ज्ञान संवर्धनासाठी प्रदर्शन भरविणे.

१५) कोणत्या प्रकारचा जातीभेद, पंथभेद, वर्णभेद न बाळगता सर्व प्रकारची आर्थिक व इतर प्रकारची मदत राष्ट्रीय आपत्तीचे वेळी आपदग्रस्तांना भुकंप, पुरग्रस्त, दंगा, वादळ, नैसर्गीक आपदग्रस्त गरीब व गरजू लोकांना करणे, विद्यार्थ्यांना वह्या-पुस्तके, पोषाख देवून मदत करणे.

१६) संस्थेच्या परिसरातील -विभागातील शिक्षकांना व सामाजिक कार्यकर्त्यांना लोकांचे जीवनमान उंचविण्यासाठी, पुर्नबांधणीसाठी नवनिर्मितीसाठी प्रशिक्षण देणे.

१७) सामाजिक निर्माणासाठी प्रयोग व संशोधन करणे शैक्षणिक माध्यमातून व इतर माध्यमातून वरील उद्दिष्टासाठी भेट, भाडेतत्व, हस्तांतर, जमिन विक्री, इमारत व इतर मालमत्तेचे देवाण-घेवाण करणे.

१८) अपंग, अनाथ, निराधार मुलांसाठी विविध उपक्रम राबविणे.

१९) महिलांची सर्वांगिण उन्नतीचे कार्य करणे व बालकल्याण, बालविकास, महिलाकल्याण, महिलाविकास संबधित योजना चालविणे.

२०) निसर्गोपचारासाठी निसर्गोपचार केंद्र स्थापन करणे.

२१) रोग चिकित्सक कॅम्प आयोजित करणे, जनतेला अंध श्रध्देपासुन परावृत्त करणे.

२२) वृक्षारोपण, व्यसनमुक्ती, सार्वजनिक स्वच्छता अभियान, साक्षरता मोहिम, सामाजिक हिताचे सर्व कार्य करणे

अध्यक्ष | उपा-ध्यक्ष | सरचिटणीस

Adv. Rikhab G. Jain
Notary (Govt. of India)

RIKHAB G. JAIN ADVOCATE & NOTARY GOVT. OF INDIA Reg. No 2553 Nashik Dist. Area MALEGAON (MAHARASHTRA)

२३) व्याख्याने, चर्चा परिसंवाद, कला पथके व सांस्कृतिक कार्यक्रमाव्दारे लोकशिक्षणाचे कार्य करणे.

मालेगांव-कॅम्प.जि.नाशिक

५) महाराजा सयाजीराव गायकवाड राष्ट्रीय ज्ञान प्रबोधिनी,४०१, गगनगिरी कॉम्पलेक्स,एकात्मता चौकाजवळ कॅम्प.रोड,मालेगांव जि.नाशिक या संस्थेचे नियम व नियमावली प्रमाणे ज्या कार्यकारी मंडळावर सदरहू संस्थेची व्यवस्था वा कारभार सोपविण्यात आलेला आहे, अशा पहिल्या कार्यकारी मंडळ सभासदाचे नांव.

संपुर्ण नांव , पत्ते, हुद्दा,वय , व्यवसाय व राष्ट्रीयत्व खालील प्रमाणे-

| अं.नं. | संपुर्ण नांव | पत्ता | हुद्दा | वय | व्यवसाय | राष्ट्रीयत्व |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | सत्यजितसिंग दुलिपसिंग गायकवाड | मु.पो.कौळाणे ता.मालेगांव जिं.नाशिक | अध्यक्ष | ४४ | शेती व व्यापार | भारतीय |
| २. | ॲड.प्रकाश विष्णू दातार | डॉ.महेबुब चाळ, मा.कॅम्प. ता.मालेगांव | उपाध्यक्ष | ४८ | वकिली | भारतीय |
| ३. | श्री.अनिल शंकर पवार | शितल निवास, टि.व्ही.सेंटर जवळ,मा.कॅम्प.ता.मालेगांव | सभासद | ४१ | इंजि. स.कार्य | भारतीय |
| ४. | श्री.दिपक शामराव सुर्यवंशी | वंदे मातरम्‌कॉम्प्लेक्स , मा.कॅम्प.ता.मालेगांव | कोषाध्यक्ष | ३७ | नोकरी | भारतीय |
| ५. | श्री.कमलाकर शंकर पवार | गगनगीरी कॉम्प्लेक्स, मा.कॅम्प.ता.मालेगांव | सरचिटणीस | ४० | इंजि. स.कार्य | भारतीय |
| ६. | श्री.प्रविण खंडेराव सोनवणे | पर्वत हाईटस्, सटाणा नाका मालेगांव ता.मालेगांव | सभासद | ३९ | नोकरी स.कार्य | भारतीय |
| ७. | डॉ.राजेश लक्ष्मण सोनवणे | साई ॲक्सीडेंट हॉस्पीटल , सटाणा नाका मालेगांव | सभासद | ३४ | वैद्यकिय | भारतीय |
| ८. | श्री.संजय शांतीलाल पहाडे | गवळी पागा, पांचकंदील मालेगांव ता.मालेगांव | सभासद | ४२ | व्यापार स.कार्य | भारतीय |
| ९. | श्री.शितल रामचंद्र पवार | शितल,वृंदावन चौक,मालेगांव ता.मालेगांव | सभासद | ३६ | शेती स.कार्य | भारतीय |
| १०. | श्री.सत्यजित सुरेश पाटील | कृष्णाई,नागाई कॉलनी, सोयगांव ता.मालेगांव | सभासद | ३६ | कॉन्ट्रॅक्टर | भारतीय |
| ११. | अभिमन अर्जुन शेलार | महालक्ष्मी कॉलनी,ऐरीगेशन ऑफिस जवळ मालेगांव कॅम्प. | सभासद | ५६ | नोकरी | भारतीय |

RIKHAB G. JAIN
ADVOCATE & NOTARY
GOVT. OF INDIA
Re. No 2553
Nashik Dist.Area
MAHARASHTRA

Adv. Rikhab G. Jain
Notary (Govt. of India)

परिशिष्ट 'क'

महाराजा सयाजीराव गायकवाड राष्ट्रीय ज्ञान प्रबोधिनी,४०१,गगनगिरी कॉम्पलेक्स,
एकात्मता चौकाजवळ कॅम्प.रोड,मालेगांव जि.नाशिक

## नियम व नियमावली

१) नियमावलीतील संदर्भीय शब्दांची व्याख्या

| | | |
|---|---|---|
| संस्था | : | महाराजा सयाजीराव गायकवाड राष्ट्रीय ज्ञान प्रबोधिनी,४०१, गगनगिरी कॉम्पलेक्स,एकात्मता चौकाजवळ कॅम्प.रोड, मालेगांव जि.नाशिक |
| अध्यक्ष | : | म्हणजे महाराजा सयाजीराव गायकवाड राष्ट्रीय ज्ञान प्रबोधिनी,४०१, गगनगिरी कॉम्पलेक्स,एकात्मता चौकाजवळ कॅम्प.रोड,मालेगांव जि.नाशिक या संस्थेचे अध्यक्ष असे समजले जाईल. |
| उपाध्यक्ष | : | म्हणजे महाराजा सयाजीराव गायकवाड राष्ट्रीय ज्ञान प्रबोधिनी,४०१, गगनगिरी कॉम्पलेक्स,एकात्मता चौकाजवळ कॅम्प.रोड,मालेगांव जि.नाशिक या संस्थेचे उपाध्यक्ष असे समजले जाईल. |
| सरचिटणीस | : | म्हणजे महाराजा सयाजीराव गायकवाड राष्ट्रीय ज्ञान प्रबोधिनी,४०१, गगनगिरी कॉम्पलेक्स,एकात्मता चौकाजवळ कॅम्प.रोड,मालेगांव जि.नाशिक या संस्थेचे सरचिटणीस असे समजले जाईल. |
| कोषाध्यक्ष | : | म्हणजे महाराजा सयाजीराव गायकवाड राष्ट्रीय ज्ञान प्रबोधिनी,४०१, गगनगिरी कॉम्पलेक्स,एकात्मता चौकाजवळ कॅम्प.रोड,मालेगांव जि.नाशिक या संस्थेचे कोषाध्यक्ष असे समजले जाईल. |
| कार्यकारी मंडळ | : | म्हणजे महाराजा सयाजीराव गायकवाड राष्ट्रीय ज्ञान प्रबोधिनी,४०१, गगनगिरी कॉम्पलेक्स,एकात्मता चौकाजवळ कॅम्प.रोड,मालेगांव जि.नाशिक या संस्थेच्या कार्यकारी मंडळात असलेले सभासद असे समजले जाईल. |
| सभासद | : | म्हणजे महाराजा सयाजीराव गायकवाड राष्ट्रीय ज्ञान प्रबोधिनी,४०१, गगनगिरी कॉम्पलेक्स,एकात्मता चौकाजवळ कॅम्प.रोड,मालेगांव जि.नाशिक या संस्थेचे सर्वसाधारण सभेचा सभासद असे समजले जाईल. |

(२) कार्यक्षेत्र : या संस्थेचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्या पुरते मर्यादित राहील.

(३) हिशोबाचे वर्ष : या संस्थेचे हिशोबाचे वर्ष १ एप्रिल ते १ मार्च असे राहील.

This Document Contains Page 1 to 19
Document Noted & Registered
LNo. 4857/2007
Dated 20/02/2007

अधीक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
नाशिक विभाग, नाशिक.

NOTARY
GOVERNMENT OF INDIA

सहायक धर्मादाय आयुक्त
नाशिक विभाग नाशिक

Adv. Rikhab G. Jain
Notary (Govt. of India)

(४) सभासदत्व व त्यांची नोंदणीची पध्दत : १८ वर्षावरील वयाचे कोणत्याही ,प्राधान्याने विशेषत: नाशिक जिल्हयातील सज्ञान,मानसिकदृष्टया सशक्त व्यक्तीला संस्थेचे सभासदत्व प्राप्त करता येईल.त्यासाठी त्यांना संस्थे कडे रितसर विहीत नमुन्यात अर्ज करावा लागेल.आलेल्या अर्जास कार्यकारी मंडळाने मंजुरी दिल्यावर,सभासदत्वाची निर्धारित वर्गणी संस्थेत जमा केल्यानंतर त्यांची नोदणी संस्थेच्या सभासद यादीमध्ये करण्यात येईल. नवीन सभासदत्वासाठी आलेल्या अर्जास कार्यकारी मंडळाच्या एका सदस्याने शिफारस करणे आवश्यक आहे.

(५) सभासदांचे प्रकार : सभासदांचे ४ प्रकार राहतील.

१) संस्थेचे अध्यक्ष व इतर सर्व पदाधिकारी यांची नियुक्ती प्रक्रीया लोकशाही मार्गाने होईल.

अ) दाता (डोनर) : संस्थेस रूपये १०००१/- (अक्षरी- दहा हजार एक मात्र) वा त्यापेक्षा जास्त रक्कम एकरकमी देणाऱ्या आणि संस्थेच्या उत्कर्षाकरीता बांधील असल्याचे आणि संस्थेची घटना तसेच नियमावली यांचा सन्मान करीत संपुर्णपणे पालन करण्याचे लेखी प्रमाणीत करणाऱ्या इसमास डोनर सभासद म्हणुन समजण्यात येईल.

ब) आजीव : सभासद संस्थेस रूपये १००१/- (अक्षरी- रू.एकहजार एक मात्र) वा त्यापेक्षा जास्त रक्कम देणाऱ्या परंतु रू.१०,००१/- पेक्षा कमी रक्कम एक रकमी देणाऱ्या आणि संस्थेच्या उत्कर्षाकरीता बांधील असलेल्याचे आणि संस्थेची घटना तसेच नियमावली यांचा सन्मान करीत संपुर्ण पणे पालन करण्याचे लेखी प्रमाणित करणाऱ्या इसमास आजीव सभा सद म्हणुन समजण्यात येईल.

क)सर्वसाधारण : सभासद संस्थेस रूपये ५०१/-(अक्षरी- रू.पाचशे एक मात्र) वा त्यापेक्षा जास्त रक्कम देणाऱ्या परंतु रू.१००१/- पेक्षा कमी रक्कम एक रकमी देणाऱ्या आणि संस्थेच्या उत्कर्षाकरीता बांधील असलेल्याचे आणि संस्थेची घटना तसेच नियमावली यांचा सन्मान करीत संपुर्ण पणे पालन करण्याचे लेखी प्रमाणित करणाऱ्या इसमास सर्वसाधारण सभासद म्हणुन समजण्यात येईल.

RIKHAB G. JAIN ADVOCATE & NOTARY GOVT. OF INDIA Re. No 2553 NashikDist.Area (MAHARASHTRA)

अध्यक्ष | उपा-ध्यक्ष | सरचिटणीस

Adv. Rikhab G. Jain
Notary (Govt. of India)

ड) लाईफ वर्कर : संस्थेच्या उपक्रमात सेवक म्हणून असलेल्या व्यक्तीस लाईफ वर्कर प्रकारचे सभासदत्व देण्यात येईल. संस्थेच्या सेवेत २५ वर्षे वा वयाचे ५८ वर्षे यापेक्षा जो कालावधी अधिक असेल तो पर्यंत हे सभासदत्व कायम समजण्यात येईल. त्यानंतर अशा प्रकारचे सभासदत्व आपोआप संपुष्टात येईल.

६) **सभासदत्व रद्द करणे :**

१) कोणताही सभासद कायदेशीर गुन्हेगार ठरला असेल, सभासदाने वर्गणी दिली नसेल, मरण पावला असेल, व्यसनी झाला असेल किंवा गैरवर्तनुक करत असेल किंवा संस्थेला नुकसान पोहचवीत आहे, असे निदर्शनास आल्यास किंवा अन्यकारणावरून कार्यकारी मंडळाने बहुमताने ठराव मंजुर करून काढून टाकल्यास सभासदत्व रद्द झाले, असे समजले जाईल.

२) कार्यकारी मंडळाच्या सभेस हजर असलेल्या सभासदांचे एखाद्या विवक्षित सभासदाविषयी असे मत झाले की, सदरचा सभासद हा संस्थेच्या हिताचे विरोधात कार्यरत असुन संस्थेच्या कार्यात अडथळा निर्माण करीत आहे अथवा सदर सभासदाचे संस्थेच्या उत्कर्षात कोणत्याही प्रकारे योगदान नाही असे वाटल्यास आणि संस्थेस सदरच्या सभासदाचे पुढीलकार्य योगदानाची गरज नाही, असे स्पष्ट झाल्यास आणि अशा परिस्थितीत बैठकिने सभासदत्व रद्द करणे बाबत बहुमताने निर्णय घेतल्यास तो या बाबतीतील अंतीम निर्णय असेल.

३) सलग दोन सर्वसाधारण वा कार्यकारी मंडळाच्या सलग तीन /चार सभांना गैरहजर राहणाऱ्या सभासदाचे सभासदत्व आपोआप रद्द झाले, असे समजण्यात येईल.

४) स्वेच्छेने राजीनामा देणाऱ्या सभासदाच्या अर्जास कार्यकारी मंडळाने मान्यता प्रदान केलेनंतर, राजीनामा मंजुर झाला, असे समजण्यात येईल. व सभासदत्व संपुष्टात येईल.

उपाध्यक्ष खजिनदार सरचिटणीस

P. V. DATAR
[illegible], LL. B.
ADVOCATE
MALEGAON 423203 (Nasik)

Identified by me
प्र. वि. दातार
Advocate

५) संस्थेच्या हिताचे विरोधात वर्तन करीत असल्याचे सिध्द झाल्यास.

६) सहा महिने सतत भारताबाहेर राहिल्यास, देश सोडून परदेशी गेल्यास.

७) न्यायालयाने नादार ठरविल्यास.

८) नैतिक किंवा फौजदारी गुन्हा शाबीत होऊन त्यास शिक्षा झालेली असल्यास अशा परिस्थितीतही सभासदत्व संपुष्टात आले असे समजण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| ७) सर्वसाधारण सभा, तिचे अधिकार आणि कार्य | : | सर्वसाधारण सभा हि संस्थेची सर्व श्रेष्ठ व शेवटचा निर्णय देणारी सभा म्हणून समजली जाईल, हि सभा वर्षातून एक वेळा तरी घेतली पाहिजे. या सभेत सर्व प्रकारचे सभासद भाग घेऊ शकतील. कार्यकारी मंडळाने चालविलेल्या कार्यावर नियंत्रण ठेवणे, आवश्यकते नुसार नियमात बदल करणे, देण्यात आलेल्या सभासदत्वास मान्यता प्रदान करणे, कार्यकारी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडीस अंतिम मान्यता देणे, निवड करणे वेळेवर येणाऱ्या ठरावावर निर्णय घेणे. |
| ८) सर्वसाधारण सभेची सुचना व गणसंख्या | : | सर्वसाधारण सभेची सुचना संस्थेच्या सर्व सभासदांना देणे आवश्यक राहील. सुचनेमध्ये दिनांक, वेळ, स्थळ, सभेचे विषय नमुद असावे. सुचना सर्व सदस्यांना संस्थेच्या डाकबुकावर सही घेऊन देता येईल. अगर टपालाव्दारे पाठविता येईल. सुचना सभेच्या २१ दिवस अगोदर पाठविणे आवश्यक राहील.<br>एकूण सभासद संख्येच्या २/३ सभासद उपस्थित झाल्यास सभेची गणपुर्ती पुर्ण झाली, असे समजण्यात येईल. गणपुर्ती अभावी सभा स्थगित झाल्यास सभेला कोरमचे बंधन राहणार नाही. परंतु अशी टिप- सुचना असने आवश्यक राहील. |
| ९) विशेष सर्वसाधारण सभा व तिचे कार्य | : | अशी सभा आवश्यकतेनुसार केव्हाही घेता येईल. जी कार्ये सर्व साधारण सभा करू शकते, अशी सर्व कार्ये करण्याचा अधिकार विशेष सर्वसाधारण सभेला राहील. |
| १०) संस्थेचे कार्यकारी मंडळ, पदाधिकारी यांची रचना | : | संस्थेच्या कार्यकारी मंडळात ९ ते ११ पदाधिकारी असतील, त्यात पुढील पदाधिकाऱ्यांचा समावेश राहील. अध्यक्ष - १, उपाध्यक्ष - १, सरचिटणीस -१, कोषाध्यक्ष - १, इतर कार्यकारी मंडळाचे सभासद राहतील. |

धर्मादाय आयुक्त विभाग नाशिक

उपा-ध्यक्ष खजिनदार सरचिटणीस

DATAR
LL. B.
ADVOCATE
MALEGAON 423203 (Nasik)

Identified before me
Advocate

११) कार्यकारी मंडळाचा कार्यकाळ व निवडणुकीची पध्दत : कार्यकारी मंडळाचा कार्यकाळ ५ वर्षाचा राहील. गुप्त मतदान पध्दतीने सर्व साधारण सभेत बहुमताने दर ५ वर्षांनी कार्यकारी मंडळ निवडले जाईल.कार्यकारी मंडळाचे पदाधिकारींची निवड त्याच सभेत बहुमताने होईल. निवडूण आलेले कार्यकारी मंडळ सभेच्या पुढील दिवसापासुन कामकाज पाहिल. कार्यकारी मंडळाच्या निवडीस सर्व साधारण सभेत स्वतंत्ररित्या अंतीम मान्यता घेणे आवश्यक आहे.कार्यकारी मंडळ निवडणुकीसाठीच्या सभेचे अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष राहतील व निवडणुक निर्णय अधिकारी म्हणुन तेच काम पाहतील.पण जर या निवडणुकीत संस्थेचे अध्यक्ष एक उमेदवार असलेतर वयोमानानुसार जेष्ठ सदस्यांची सभाध्यक्ष म्हणुन निवड करण्यात यावी, अशा परिस्थितीत निवडणुक निर्णय अधिकारी म्हणुन तेच काम पाहतील.

१२) कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी व त्यांची कामे

अध्यक्ष : सभेचे अध्यक्षस्थान स्विकारून कामकाज चालविणे व संस्थेच्या हितसंबंधाचे योग्य ते आदेश देणे. संस्थेच्या कारभारावर व त्यांच्या शाखेवर नियंत्रण ठेवणे. नोटीस काढून सभा आयोजित करणे ,रकमेची देवाण-घेवाण करणे वगैरे.

उपाध्यक्ष : अध्यक्षांचे गैरहजेरीत अध्यक्षांचे काम करणे,अन्यथा अध्यक्षांना संस्थेच्या कामात योग्यती मदत करणे.

सरचिटणीस :
१) संस्थेच्या सभा बोलविणे.
२) संस्थेचा पत्रव्यवहार करणे.
३) तक्रारींचे निवारण करणे.
४) संस्थेच्या कर्मचाऱ्यांवर लक्ष ठेवणे.
५) किरकोळ नियम तयार करणे.
६) संस्थेच्या दृष्टीने आवश्यक ती कोर्ट कचेरीची कामे करणे.
७) वार्षिक हिशोबाची पत्रके तयार करून सर्वसाधारण सभे ठेवणे.
८) रोजचे हिशोब पाहून त्यावर सह्या करणे.
९) खर्चाची बिले मंजुर करणे.
१०) संस्थेच्यावतीने रकमेची देवाण-घेवाण करणे.
११) संस्थेच्या मालमत्तेची देखरेख करणे.
१२) मंजुर झालेले ठराव अंमलात आणणे.

अध्यक्ष | उपा-ध्यक्ष | सरचिटणीस

RIKHAB G. JAIN
ADVOCATE & NOTARY
GOVT. OF INDIA
Re. No 2553
Nashik Dist. Area
MALEGAON (MAHARASHTRA)

Adv. Rikhab G. Jain

१३) संस्थेच्या दृष्टीने हितावह असलेले इतर कोणतेही काम करणे.

१४) संस्थातंर्गत तसेच संस्थेच्या विविध उपक्रमांकरीता कर्मचाऱ्यांच्या रितसर नियुक्तया करणे, बदली, पदोन्नती करणे, कर्मचाऱ्यांचे संदर्भातील सेवाशर्ती नियमाप्रमाणे आवश्यकती कार्यवाही वेळोवेळी करणे.

१५) संस्थातंर्गत व संस्था उपक्रामाचे दृष्टीने प्रशासकिय कामकाज पाहणे.

कोषाध्यक्षा : संस्थेच्या आर्थिक परीस्थितीवर नियंत्रण ठेवणे , हिशोब लिहणे अगर लिहून घेणे. हिशोब पुर्ण झाल्यावर कार्यकारी मंडळापुढे ठेवणे , हिशोबाच्या पुस्तकातुन वार्षिकपत्रके तयार करणे, रकमेची देवाण-घेवाण करणे, ऑडीटर यांनी हिशोबातुन काढलेल्या त्रुटिंची पुर्तता करणे इत्यादी.

इतर सभासद : सर्वसाधारण सभेत उपस्थित राहणे, निवडणुकीच्या वेळी मतदान करणे व संस्थेचे कामात आवश्यक ती मदत करणे.

१३) कार्यकारी मंडळाची सभा व मागणीची सभा : कार्यकारी मंडळाच्या वर्षातुन कमीतकमी ३ सभा घेण्यात येतील. संस्थेच्या कोणत्याही सभासदांनी मागणी केल्यास अध्यक्षांनी किंवा सेक्रेटरींनी कार्यकारी मंडळाची सभा मागणी केल्यापासुन १५ दिवसाचे आत बोलविण्याचे बंधन राहील, अशी सभा बोलवितांना सुचनेत मागणीचे विषय नमुद करणे आवश्यक राहील. मागणीच्या सभेला कार्यकारी मंडळाचे सर्व अधिकार राहतील.

१४) कार्यकारी मंडळाच्या सभेची सुचना व गणसंख्या : कार्यकारी मंडळाच्या सभेची सुचना ७ दिवस अगोदर देणे आवश्यक राहील. सुचनेमध्ये दिनांक, वेळ, ठिकाण व सभेचे विषय नमुद करणे आवश्यक राहील. सुचना संस्थेच्या डाकबुकात सही घेऊन अथवा टपालाव्दारे पाठविता येईल. कार्यकारी मंडळाचे २/३ सभासद उपस्थित झाल्यास गणसंख्या पुर्ण झाली असे समजले जाईल.

अध्यक्ष | उपा-ध्यक्ष | सरचिटणीस

Adv. ... Notary (Govt. of India)

१५) कार्यकारी मंडळाचे निवडणुकीचे नियम :

कार्यकारी मंडळाच्या निवडणुकीचे नियम सर्वसाधारण सभा ठरविल,त्याप्रमाणे राहील.ज्या सभासदांकडे संस्थेची कोणतीही रक्कम घेणे बाकी आहे, आणि ज्या सभासदावर त्याच्या सेवेच्या ठिकाणी ठपका ठेवण्यात आला असेल वा गंभीर गुन्हयाखाली आरोपपत्र दाखला असेल. ६ महिने सतत भारताबाहेर राहत असल्यास,न्यायालयाने नादार ठरविल्यास अगर त्याचेवर नैतिक किंवा फौजदारी गुन्हा शाबीत होऊन ज्या सभासदास एखाद्या गुह्यात शिक्षा झालेली असेल अशा सभासदाला निवडणुकीत उमेदवार म्हणुन उभेराहता येणार नाही व मतदान करण्याचा सुध्दा हक्क राहणार नाही.

१६) कार्यकारी मंडळातील रिक्त पद भरण्याबाबत. :

कोणत्याही कारणास्तव कार्यकारी मंडळातील पद /पदे रिक्त झाल्यास उर्वरित कालावधीसाठी कार्यकारी मंडळाच्या बहुमताने रिक्त पद / पदे भरण्यात येतील. या नियुक्तीलाही पुढील सर्वसाधारण सभेची अंतीम मान्यता घेण्यात यावी. ६ महिन्यापेक्षा जास्त कालावधी पद/पदे रिक्त राहिल्यास ते भरण्याचा अधिकार मा. स. धर्मादाय आयुक्त यांना राहील.

१७) कार्यकारी मंडळाचे अधिकार व कर्तव्ये. :

कायकारी मंडळ संस्थेच्या सर्व कारभारावर नियंत्रण ठेवील सर्वसाधारण सभेने मंजुर केलेल्या ठरावाची पुर्तता करील. संस्थेचे काम सुचना रूपाने चालावे, म्हणुन किरकोळ नियम तयार करील.आवश्यकतेनुसार त्यात बदल करू शकेल, तसेच एखादी कार्यकारीता उपसमिती नियुक्त करू शकेल व त्यांचेकडून हिशोब तसेच वेळोवेळी माहिती घेऊ शकेल व कार्यसमाप्तीनंतर उपसमिती रद्द करू शकेल.संस्थेच्या असलेल्या सर्वकायदेशीर बाबी पुर्ण करणे, हिशोबावर नियंत्रण ठेवणे, तक्रारींची दखल घेणे, कार्यकारी मंडळाचे रिक्त स्थान भरणे,सेवकांची नियुक्त करणे,त्यांना काढून टाकणे व अन्य आवश्यक ती सर्व कामे करणे,बहुमताने मंजुर झालेले ठराव कायदेशीर ठरून अंमलात येईल.

१८) संस्थेचा निधी, मिळकत व विनीयोग :१)

सभासद फि , देणगी, वर्गणी,अनुदान,हे संस्थेचे उत्पन्नाचे साधन राहील. संस्थेच्या उद्देशपुर्ती करीता निधी गोळा करता येईल वतो स्थावर जंगम स्वरूपाचे मिळकतीसाठी गुतंविता येईल, अशा मिळकतीची नोंद पब्लीक ट्रस्ट रजिस्टरमध्ये बदल अर्ज देऊन करावी लागेल.तसेच नजरचुकीने किंवा अन्यकाही कारणास्तव मिळकत दाखविली गेली नाही तर, हि संस्थेची मिळकत संस्थेच्या मिळकतीत अंतभूत समजण्यात येईल.

BIKHAB G. JAIN ADVOCATE & NOTARY GOVT. OF INDIA Reg. No 2553 MAHARASHTRA

अध्यक्ष | उपा-ध्यक्ष | सरचिटणीस

Adv. Bikhab G. Jain

| | | |
|---|---|---|
| | २) | संस्थेची सर्व मालमत्ता संस्थेच्या योजनेनुसार नोंदण्यात येणाऱ्या व नियुक्त केलेल्या कार्यकारी मंडळ पदाधिकारी यांचे नावे राहील किंवा संस्थेच्या नावाने राहील.संस्थेच्या सर्व मिळकत मालमत्तेची व्यवस्था देखभाल आणि कार भार कार्यकारी मंडळामार्फेत किंवा ज्यास अधिकार देण्यात येईल,त्यांचे मार्फेत या नियमावलीतील व मुंबई सार्वजनिक विश्वस्त नोंदणी कायदा १९५० चे तरतुदीनुसार होईल. |
| १९) उद्दिष्टनिहाय खर्चाची तरतुद (टक्केवारी प्रमाणे) | : | ज्या उद्देशाने रक्कम गोळा केली असेल त्या उद्देशावर ती रक्कम १००% खर्च करण्यात येईल,गरजे नुसार शैक्षणिक ५०% व धर्मादाय ५०% अशा पध्दतीने रक्कम खर्च करणे बाबत कार्यकारी मंडळ बहुमताने योग्यतो निर्णय घेऊन कार्यवाही करेल. |
| २०) कर्ज किंवा ठेवी यासंबंधी तरतुद. | : | संस्थेला आवश्यकता भासल्यास कोणत्याही व्यक्तीकडून किंवा बँकेकडून कर्ज किंवा ठेवी स्विकारता येईल, त्या करिता मे.धर्मादाय आयुक्त/सहआयुक्तांची पुर्व परवानगी घेणे आवश्यक राहील. |
| २१) स्थावर मालमत्ता खरेदी विक्री करणेबाबतची तरतुद | :१) | संस्थेला स्थावर तसेच जंगम मालमत्ता खरेदी करणे तसेच विक्री करणे, भाड्याने घेणे,अथवा देणे,गहाण ठेवणे कर्ज काढणे,निधी जमविणे व देणेचा अधिकार राहील, संस्थेला त्याकरीता कार्यकारी मंडळाची बहुमताने समंती घ्यावी लागेल,संस्थेची स्थावर मालमत्ता विक्री करावयाची असल्यास ती विकण्यापुर्वी मे.धर्मादाय आयुक्त ,नाशिक यांचे नियमोप्रमाणे परवानगी घेणे आवश्यक राहील. |
| | २) | कार्यकारी मंडळाने संस्थेची स्थावर मालमत्ता ,इमारत व विविध वास्तु इत्यादी मिळकत नेहमी चांगल्यास्थितीत ठेवाव्यात. दुरूस्ती ,नविन बांधकाम आणि वेळोवेळी नुतनीकरणाचे काम कार्यकारी मंडळास करण्याचे अधिकार राहतील. रू.१०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे दुरूस्ती, नुतनीकरण वा नविन बांधकाम असेल तर संस्थेने निविदा मागवुन हे काम करावे, परंतु कार्यकारी मंडळ जर हे काम स्वताच्या देखरेखीखाली करीत असल्यास व तसे ठरविण्या त अल्यास निविदा मागविण्याची जरूरी नाही. |
| २२) बँक खाते | : | संस्थेजवळ शिल्लक असलेली रक्कम कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेत किंवा मान्यता असलेल्या शेड्युल बँकेत संस्थेच्या नावाने ठेवता येईल.अध्यक्ष,सेक्रेटरी व खजिनदार ह्या ३ पदाधिकाऱ्यापैकी कोणत्याही २ पदाधिकाऱ्यांची संयुक्त सहीनेही रक्कम काढता येईल. |

अध्यक्ष     उपा-ध्यक्ष     सरचिटणीस

Adv. Rikhab G. Jain
Notary (Govt. of India)

| | | |
|---|---|---|
| २३) सभासदांची यादी ठेवण्याची पध्दत | : | १८६० चे संस्था नोंदणी अधिनियमातील कलम १५ अनुसार संस्थेचे जे सभासद असतील , त्यांची एक यादी १९७१ चे महाराष्ट्र संस्था नोंदणी नियमातील नियम १५ प्रमाणे अनुसुची एकच्या नमुन्यात ठेवण्यात येईल. १८६० चे संस्था अधिनियमातील कलम ४ प्रमाणे व १९७१ चे संस्था नोंदणी नियम ७ प्रमाणे दरवर्षी कार्यकारी मंडळाची यादी अनुसूची एकच्या नमुन्यात आपले विभागाचे सहायक संस्था निबंधकाचे कार्यालयात पाठवावी लागेल. |
| २४) नियम आणि नियमावलीत बदल करण्याची तरतुद | : | संस्थेच्या नियम आणि नियमावलीत बदल करावयाचा असल्यास अथवा नवीन तरतुद करावयाची असल्यास सर्वसाधारण सभेत उपस्थित सभासदांच्या ३/५ बहुमताने ठराव मंजुर करून त्याप्रमाणे नियमावलीत बदल आणि नविन तरतुद करता येईल. यासंदर्भात १८६० चे संस्था नोंदणी अधिनियमाचे कलम १२ प्रमाणे कार्यवाही पुर्ण करावी लागेल. |
| २५) संस्थेच्या नावात व उद्देशात बदल करण्याबातची तरतुद | : | संस्थेच्या नावात किंवा उद्देशात बदल करावयाचा झाल्यास अथवा दोन संस्थेचे विलीनीकरण करावयाचे असल्यास १८६० चे संस्था नोंदणी अधिनियमातील कलम १२ अथवा १२ - अ प्रमाणे कार्यवाही पुर्ण करावी लागेल. तसेच संस्थेच्या कार्यकारी मंडळाने ठराव संमत करून याबाबत निर्णय घ्यांवा. |
| २६) विसर्जन | : | संस्थेचे कार्य बंद करावयाचे असल्यास ३/५ सभासदांच्या बहुमताने सर्वसाधारण सभेत मंजुरी घ्यावी लागेल.संस्थेचे सर्व प्रकारचे देणे -घेणे बाबतचे व्यवहार पुर्ण करावे लाग - तील तसेच संस्थेची शिल्लक मालमत्ता अन्य दुसऱ्या संस्थेला दान म्हणुन देता येईल.१८६० चे संस्था नोंदणी अधिनियमाचे कलम १३ व १४ प्रमाणे संस्था विसर्जनाची कार्यवाही पुर्ण करावी लागेल. |

RIKHAB G. JAIN ADVOCATE & NOTARY GOVT. OF INDIA Reg. No 2553 (MAHARASHTRA)

| अध्यक्ष | उपा-ध्यक्ष | सरचिटणीस |
|---|---|---|

Adv. Rikhab G. Jain
Notary (Govt. of India)

मालेगाव कॅम्प. जि. नाशिक

६) आम्ही खालील सह्या करणारे महाराजा सयाजीराव गायकवाड राष्ट्रीय ज्ञान प्रबोधिनी,४०१,गगनगिरी कॉम्पलेक्स, एकात्मता चौकाजवळ कॅम्प.रोड,मालेगांव जि.नाशिक चे सदस्य जाहिरकरतो की, संस्थानोंदणी अधिनियम १८६० अन्वये अभिप्रेत केलेली संस्था अस्तित्वात आणण्याची आमची इच्छा असुन , वरील उद्देशाने आम्ही एकत्र येऊन महाराजा सयाजीराव गायकवाड राष्ट्रीय ज्ञान प्रबोधिनी, (मालेगाव-कॅम्प. जि. नाशिक) ४०१ , गगनगिरी कॉम्पलेक्स,एकात्मता चौकाजवळ कॅम्प.रोड,मालेगांव जि.नाशिक दि.९/१२/२००६ रोजी स्थापन केली असून , ती संस्था अधिनियम १८६० अन्वये नोंदणी करण्यासाठी आम्ही या विधान पत्रावर सह्या केल्या आहेत.

| अ.नं. | सभासदाचे नांव | सह्या |
|---|---|---|
| १. | श्री.सत्यजितसिंग दुलिपसिंग गायकवाड | |
| २. | ॲड.प्रकाश विष्णू दातार | |
| ३. | श्री.अनिल शंकर पवार | |
| ४. | श्री.दिपक शामराव सुर्यवंशी | |
| ५. | श्री.कमलाकर शंकर पवार | |
| ६. | श्री.प्रविण खंडेराव सोनवणे | |
| ७. | डॉ.राजेश लक्ष्मण सोनवणे | |
| ८. | श्री.संजय शांतीलाल पहाडे | |
| ९. | श्री.शितल रामचंद्र पवार | |
| १०. | श्री.सत्यजित सुरेश पाटील | |
| ११. | श्री.अभिमन अर्जुन शेलार | |

स्थळ : मालेगांव

दिनांक : 20/ 2/2006

वरील सह्या करणाऱ्या इसमास मी ओळखतो व त्यांनी माझ्या समक्ष या विधानपत्रावर सह्या केल्या आहेत.

दिनांक : 20/ 2/2006

ATTESTED BY ME

Rikhab G. Jain
Advocate & Notary
(Govt. of India)
Chamber No. 166
Malegaon Court, Malegaon

सही-

Rikhab G. Jain
Advocate & Notary
Govt. of India

विशेष कार्यकारी दंडाधिकारी/वकील/सनदी लेखापाल

नोटरी, संपुर्ण नांव,पत्ता व शिक्का

Adv. Rikhab Ghewarchand Jain
Chember No. 166 Malegaon

खरी प्रत / नक्कल

अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
नाशिक विभाग, नाशिक.

# दाखला

प्रमाणित करण्यात येते की, महाराजा सयाजीराव गायकवाड राष्ट्रीय ज्ञान प्रबोधिनी, ४०१, गगनगिरी कॉम्पलेक्स, एकात्मता चौकाजवळ कॅम्प.रोड,मालेगांव जि.नाशिक या संस्थेचे नियम व नियमावलीची प्रस्तुत प्रमाणे सत्यप्रत आहे.

| अ.नं. | पदाधिकाऱ्यांचे संपुर्ण नांव | हुद्दा | स्वाक्षरी |
|---|---|---|---|
| १. | श्री. सत्यजितसिंग दुलिपसिंग गायकवाड | अध्यक्ष | |
| २. | ॲड.प्रकाश विष्णू दातार | उपाध्यक्ष | |
| ३. | श्री.कमलाकर शंकर पवार | सरचिटणीस | |

स्थळ : मालेगांव

दिनांक : 20/2/2007

Kamlakar Shankar Pawar
Digitally signed by Kamlakar Shankar Pawar
Date: 2021.04.19 10:39:07 +05'30'

ATTESTED BY ME
Rikhab C. Jain
Advocate & Notary
(Govt.of India)
Chamber No. 106
Malegaon Court, Malegaon

NOTARY
RIKHABCHAND JAIN

...ment Contains Page 1 to 19
...ted & Registered
48 9/2007
20/02/2007

खरी प्रत / नक्कल

अधीक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
नाशिक विभाग, नाशिक.

सहाय्यक धर्मादाय आयुक्त
नाशिक विभाग नाशिक